imma™


# Lokmat

## MIT-LRA to inaugurate City Beautification Through Lighting

**Date: 19-02-2008 | Edition: Pune | Page: 3 | Source: Bureau | Clip size (cm): W: 8 H: 13**

**Clip: 1 of 1**


# वीजबचत व सौंदर्यवृद्धीसाठी एमआयटीचा 'एसईई' प्रकल्प

**पुणे, दि. १८ (प्रतिनिधी) :** शहरातील सौंदर्यामध्ये प्रकाश योजनेद्वारे भर घालतानाच वीजबचत व पर्यावरणसंवर्धन करण्याच्या उद्देशाने माईर्स एमआयटी लायटिंग रिसर्च अॅकेडमीच्या वतीने 'सेव्ह इलेक्ट्रिसिटी एन एन्व्हायर्मेंट'(एसईई) हा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे, अशी माहिती एमआयटीचे कार्यकारी संचालक सुनील कराड यांनी दिली.

एमआयटी लायटिंग रिसर्च अॅकेडमीच्या वतीने 'प्रकाश योजनेद्वारे शहर संवर्धन' या विषयावर आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्‌घाटन विप्रो लायटिंगच्या सी अँड आय बिझनेसचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेश कोचर यांच्या हस्ते झाले. त्यानिमित्ताने आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. या प्रसंगी ऑस्ट्रेलियातील युनिव्हर्सिटी ऑफ सिडनीचे संचालक आणि आर्किटेक्चरल अँड डिझाईन पॅसिफिकाचे प्रोफेसर, लायटिंग स्टडीजचे संचालक प्रो. डॉ. वॅरेन ज्युलियन व इंटरनॅशनल डार्कस्काय असोसिएशनच्या एशिया पॅसिफिक कार्यालयाचे प्रमुख रेग विल्सन, एमआयटीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. विश्वनाथ कराड उपस्थित होते.

कराड म्हणाले, या नवीन प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यामध्ये शहरातील काही परिसराचे सर्वेक्षण करण्यात आले. डॉ. वॅरेन ज्युलियन यांच्या मार्गदर्शनाखाली एमआयटी लायटिंगच्या विद्यार्थ्यांनी एमआयटी गुरुकुल, आगाखान पॅलेस, मगरपट्टा सिटी, शनिवारवाडा, एम.जी. रस्ता या परिसरांत फिरून तेथील वीजवापराची माहिती घेतली. त्यानुसार काही निष्कर्ष काढले व उपाययोजना सुचवल्या. शासनाच्या वतीने रस्त्यावरील दिव्यांसाठी कोट्यवधी रुपये खर्च केले जातात; परंतु त्याच्या देखभालीकडे दुर्लक्ष होते. दिव्यांवरील धूळ व काचा साफ केल्यास प्रकाशामध्ये वाढ होऊ शकेल, असे निरीक्षण डॉ. वॅरेन ज्युलियन यांनी नोंदवले.

आंतरराष्ट्रीय परिषदेत या विषयावर विविध तज्ज्ञांनी मते मांडून उपयुक्त सूचना केल्या.